

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. ३१ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला पश्चिम विभागीय युवक महोत्सवात ललित कला विभागात उपविजेते पद प्राप्त झाले आहे.

नागपूरच्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ येथे नुकताच पश्चिम विभागीय युवक महोत्सव झाला. या महोत्सवात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा संघ सहभागी झाला होता. ललित कला विभागात विद्यापीठाच्या संघाला उपविजेते पद प्राप्त झाले त्यामध्ये क्ले मॉडेलिंगमध्ये देवा सपकाळे या विद्यार्थ्याला सुवर्णपदक प्राप्त झाले तर इन्स्टॉलेशन कला प्रकारात रौप्य पदक प्राप्त झाले. या कला प्रकारात देवा सपकाळे, माधुरी बडगुजर, तौसिफ शेख, समय चौधरी या विद्यार्थ्यांचा समावेश होता. याशिवाय स्पॉट फोटोग्राफी स्पर्धेत समय चौधरी या विद्यार्थ्याला कास्य पदक प्राप्त झाले. हे सर्व विद्यार्थी मुळजी जेठा महाविद्यालयाचे आहेत. या संघासोबत डॉ. जुगलकिशोर दुबे व डॉ. सुनीता कावळे हे संघ व्यवस्थापक म्हणून गेले होते. विद्यापीठाला प्रथमच पश्चिम विभागीय युवक महोत्सवातील कला प्रकारात उपविजेते पद प्राप्त झाले आहे.

या विजयी संघाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे तसेच व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, प्रा. अनिल डोंगरे, प्रा. शिवाजी पाटील, ॲड अमोल पाटील, नितिन झाल्टे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी अभिनंदन केले.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. ३१ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे प्रशाळेतंर्गत असलेल्या राज्यशास्त्र व लोकप्रशासन विभागाच्यावतीने मतदार जनजागृतीचा भाग म्हणून दि. २५ ते ३० जानेवारी २०२४ या कालावधीत लोकशाही सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.

या कालावधीत वक्तृत्व स्पर्धा, भित्तीपत्रक, घोषवाक्य, कौन बनेगा चाणाक्ष वोटर आदी स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. भित्तीपत्रक स्पर्धेत नागेश्वर सपकाळ आणि जयेश पाटील, तर वक्तृत्व स्पर्धेत मुकेश भालेराव आणि शरद सोनवणे विजेते ठरले. घोषवाक्य स्पर्धेत वैष्णवी पाटील आणि विवेक पाटील तर प्रश्नमंजुषा स्पर्धेत फैजान पटेल व दामिनी पाटील विजेते ठरले. या सप्ताहाचा समारोप प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांच्या उपस्थितीत झाला. प्रशाळेचे प्रभारी संचालक डॉ. अजय पाटील आणि विभागप्रमुख डॉ. उमेश गोगडिया यावेळी उपस्थित होते. प्रा. प्रदीप गोफणे यांनी सुत्रसंचालन केले तर प्रा. मोईन शेख यांनी आभार मानले.

..........................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: ३० जानेवारी, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी